ePaper

# IAS अधिकारी असल्याचं भासवून नवऱ्यासह अनेकांना गंडवलं

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 06 सप्टेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!





पान 2 वरुन...

रूपाली ठोंबरेंच्या टीकेला बापटांचे प्रत्युत्तर!

## पाकिस्तानचा अवघ्या ५२ चेंडूंत केला लाजिरवाणा पराभव

# शाब्बास पोरींनो!

## आशिया कपमध्ये भारताच्या वाघिणींची विजयी दहीहंडी!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

भारताने ७ विकेट्सने पाकिस्तानवर महिला आशिया चषक सामन्यात शानदार विजय नोंदवला. पाकिस्तानने दिलेल्या ५६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना टीम इंडियाने ८.४ षटकांत दणदणीत विजय आपल्या नावे केला. हरमनप्रीत कौरने या ऐतिहासिक सामन्यात विजयी षटकार लगावत संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. पाकिस्तानची कर्णधार फातिमा सनाने ३ विकेट्स घेतल्या आणि चांगली झुंज दिली. पण त्याशिवाय पाकिस्तानचा उर्वरित संघ भारतासमोर फेल ठरला.

### पाकिस्तानची प्रथम फलंदाजी

नाणेफेक जिंकल्यानंतर पाकिस्तानची कर्णधार फातिमा सनाने प्रथम फलंदाजी करण्याचा घेतलेला निर्णय आश्चर्यकारक ठरला आणि संघासाठी चांगलाच धक्कादायक ठरला. सलामीच्या जोडीने २७ धावांची सुरुवात करून दिली असली, तरी त्यानंतरच्या फलंदाजांनी केवळ नावापुरतीच फलंदाजी केली.

महिला आशिया चषकात भारतीय संघाच्या वर्चस्वपूर्ण कामगिरीचा सामना पाकिस्तानचा संघही करू शकला नाही. उपांत्य फेरीतील स्थान आधीच निश्चित केलेल्या भारतीय संघाने आपला गट-फेरीतील शेवटचा सामना पाकिस्तानविरुद्ध खेळला. या सामन्याबाबत मोठी उत्सुकता असली, तरी याचा निकाल मात्र मागील चार सामन्यांसारखाच लागला. पाकिस्तानचा डाव अवघ्या ५५ धावांत गुंडाळल्यानंतर, भारतीय संघाने केवळ ५२ चेंडूंत हे लक्ष्य गाठत ७ गडी राखून विजय मिळवला. अशा प्रकारे, भारतीय संघाने सलग तीन विजयांसह गट-फेरीची सांगता केली.

भारताविरूद्धचा विजयाचा दुष्काळ संपवण्याचा पाकिस्तानचा प्रयत्न अपयशी ठरला. ऑक्टोबर २०२२ पासून टीम इंडियाविरुद्धचे सर्व चारही सामने पाकिस्तानने गमावले आहेत. फातिमा सनाच्या नेतृत्वाखालील पाकिस्तानी संघाची विजयाची प्रतीक्षा यावेळीही संपली नाही, कारण भारतीय गोलंदाजांनी सुरुवातीच्या टप्प्यातच पाकिस्तानला सामन्यातून अक्षरशः बाहेर फेकलं. पाकिस्तानने चांगली सुरूवात केली खरी, पण भारताच्या गोलंदाजांनी त्यांना सतत धक्के देत सामन्याबाहेर केलं.

### भारताचा पाकिस्तानच्या संघावर दणदणीत विजय

पाकिस्तानने दिलेल्या अवघ्या ५६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताने ३ विकेट्स गमावत ५७ धावा केल्या. शफाली वर्माने पहिल्या चेंडूवर षटकार लगावत दणक्यात सुरूवात केली. पण फातिमा सनाच्या दुसऱ्या षटकात सरळ ड्राईव्ह खेळताना १२ धावांवर झेलबाद झाली. त्याच षटकात प्रतिका रावलदेखील बाद होत माघारी परतली. त्यानंतर चौथ्या षटकात स्मृती मानधनाला फातिमा सनाने पायचीत करत बाद केलं. रिव्ह्यूची सिस्टिम नसल्याने महिलांच्या आशिया चषकात डीआरएस घेतला जात नाही. यानंतर जेमिमा रॉड्रिग्ज आणि हरमनप्रीत कौर यांनी डाव सावरत भारताला विजयाच्या उंबरठ्यावर नेले. अखेर भारताने अवघ्या ७.४ षटकांत ५७ धावा करत पाकिस्तानवर ७ विकेट्सने दणदणीत विजय मिळवला.



# रूपाली ठोंबरेंच्या टीकेला बापटांचे प्रत्युत्तर!

## रुपाली ठोंबरे पाटील यांचा बापटांच्या पुणेकर असण्यावरच प्रश्न उपस्थित

**महाईन्यूज । पुणे**

**गणेशोत्सवातील लाऊडस्पीकर, डीजे, ढोल-ताशांच्या कर्णकर्कश आवाजाला विरोध करणाऱ्या विद्यानंद बापटांचे नाव आता राज्यभरात चर्चेत आहे. आधी पुणे महानगरपालिकेच्या जनसभेतून त्यांची झालेली हकालपट्टी आणि नंतर ३ सप्टेंबरला त्यांना झालेल्या मारहाणीमुळे ही ते चांगलेच व्हायरल झाले आहेत. विद्यानंद बापट त्यांच्या मराठी भाषेवरील प्रभुत्वामुळे आणि अभ्यासपूर्ण भूमिकांमुळे ही सर्वत्र चर्चेत आहेत. थेट मुख्यमंत्र्यांनीही त्यांच्या भाषेचे विशेष कौतुक केले आहे.**



पॉलिटिकल महाराष्ट्र या यूट्यूब चॅनेलला दिलेल्या मुलाखती दरम्यान बापटांनी यावर उत्तर दिलं आहे. मुलाखतकाराने टीकेबद्दल विचारले असता, बापटांनी रूपाली ठोंबरे यांच्या टीकेला उत्तर दिले आहे. बापट म्हणाले की, "हा पूर्णपणे तार्किक खोटारडेपणा आहे. स्वतः लोकमान्य टिळक, ज्यांनी गणेशोत्सवाची सुरुवात केली, ते रत्नागिरीहून पुण्यात आले होते. मुळात हा जो युक्तिवाद आहे तो हुकूमशाही प्रवृत्तीचा आहे. डोनाल्ड ट्रम्पसारखी माणसे असा युक्तिवाद करतात. हा तार्किक खोटेपणा आहे."

असा प्रश्न विद्यानंद बापट यांना न्यूज १८ मराठीच्या कार्यक्रमात विचारण्यात आला. विद्यानंद बापट यांनी महाभारताचा दाखला दिल्याने त्यांना लागलीच तुमचा श्रीकृष्ण कोण असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर ते सहज बोलून गेले की, "मी स्वतःच." यावेळी त्यांनी श्रीमद्भगवद्गीतेतील श्लोकही सांगितला. "उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।आत्मैव ह्यात्मनो बन्धुरात्मैव रिपुरात्मनः ॥" असं बापट म्हणाले. विद्यानंद बापट यांच्या या श्लोकाचा अर्थ असा की, "मनुष्याने स्वतःच्या मनाद्वारे स्वतःचा उद्धार करावा, स्वतःला अधोगतीला नेऊ नये (स्वतःचा घात करू नये); कारण माणूस स्वतःच स्वतःचा मित्र आहे आणि स्वतःच स्वतःचा शत्रूही आहे."

बापटांच्या या उत्तरानंतर त्यांच्या वक्तव्याची राजकीय आणि सामाजिक वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. श्रीकृष्णाच्या संदर्भातील बापटांच्या उत्तरावरूनही सोशल मीडियावर विविध प्रतिक्रिया उमटताना दिसत आहेत. त्यामुळे बापटांचे हे वक्तव्य आगामी काळात आणखी चर्चेचा विषय ठरण्याची शक्यता आहे.

### पुणेकरांना गणेशोत्सव साजरा करायला शिकवू नये

रुपाली ठोंबरे पाटील यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत बापट यांच्या पुणेकर असण्यावरच प्रश्न उपस्थित केला होता. "रत्नागिरीहून ७ वर्षांपूर्वी पुण्यात नोकरीला आलेल्या माणसाने पुणेकरांना गणेशोत्सव कसा साजरा करावा हे शिकवू नये," असे त्यांनी म्हटले आहे. "विद्यानंद बापट हे पुणेकर नाहीत म्हणून गणपती बाप्पा उत्सवाला गालबोट लावण्याची हिंमत झाली", अशी टीका करत, "पुणे म्हणजे काय हे पुण्यात जन्मलेल्या रक्तालाच कळतं", असे ठोंबरे पाटील यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे. "गणपती कार्यकर्ता नारायण पेठ, शनिवार पेठ, लक्ष्मी रस्ता, लोकमान्य टिळक रस्ता, श्रीमंत थोरले,बाजीराव रस्त्यावर लहानाचे मोठे झालेत. पेठेत घराघरांतून, दुकानातून वर्गणी काढून गणपती बाप्पा उत्सव साजरे करण्याचा १३० वर्षांची परंपरा आहे हो. इथे ढोलाच्या थापेवर कार्यकर्त्यांचे बालपण गेलंय, गणपतीच्या वर्गणीसाठी गणपती कार्यकर्ते उन्हात फिरले, फक्त DJ चा विषयच नाही", असे ठोंबरे पाटील यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे.

# पुणे बनणार देशातील सर्वांत वेगवान वाहतुकीचे शहर! मुख्यमंत्र्यांनी सांगितला 'प्लॅन'

**महाईन्यूज । पुणे**

**पुण्यातील वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत आहे. यावरून स्थानिक प्रशासनासह राज्य सरकारवर सातत्याने टीका होत आहे. पुण्यातील ही परिस्थिती बदलण्याचा निर्धार आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. पुढील तीन ते चार वर्षांत पुण्याची ओळख देशातील सर्वांत वेगवान वाहतूक असलेले शहर अशी बनेल, असा जाहीर शब्द मुख्यमंत्र्यांनी पुणेकरांना दिला आहे.**




पुण्याला देशातील सर्वाधिक वेगवान वाहतुकीचे शहर बनवण्याचे नियोजन करण्यात आले आहे असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, पुण्यातील वाहतूक व्यवस्था सक्षम करण्यासाठी अनेक पायाभूत सुविधा प्रकल्पांची कामे सुरू आहेत. त्यात बाह्य वर्तुळाकार मार्ग, अंतर्गत वर्तुळाकार मार्ग, भुयारी मार्ग, उच्च क्षमता द्रुतगती मार्ग यांचा समावेश आहे. यातील काही कामे सूर असून उरलेल्या कामांना गती देण्यात येत आहे. या जोडीला शहरात मेट्रोचे जाळे वेगाने विस्तारत आहे. तसेच पीएमपीही सक्षम करण्यात येत आहे. त्यामुळे पुढील तीन ते चार वर्षांत पुण्यातील वाहतूक देशात सर्वाधिक वेगवान बनलेली असेल.

'बजाज फिनसर्व्ह'च्या मुख्यालयाच्या भूमिपूजन कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. या वेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, महापौर मंजूषा नागपुरे, 'बजाज फिनसर्व्ह'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक संजीव बजाज, बजाज फिनसर्व्ह सीएसआरच्या अध्यक्ष शेफाली बजाज, बजाज फायनान्सचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राजीव जैन, महापालिका आयुक्त नवल किशोर राम, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्यासह बजाज समूहातील पदाधिकारी, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, पुण्यात उभारण्यात येणारे बजाज फिनसर्व्हचे मुख्यालय आणि त्यातील सुविधा देशातील महत्त्वाची आणि शाश्वत व्यवस्था ठरणार आहे. या व्यवस्थेत सुमारे ४० हजार कर्मचारी सहभागी होणार आहेत. मुंढवा परिसराला जोडणारा रस्ता आणि अतिरिक्त पुलाची उभारणी मुख्यालयाचे काम पूर्ण होण्यापूर्वी उभारण्यात येईल. बजाज समूहाने पुण्यात कला आणि सांस्कृतिक केंद्र उभारण्याचा मनोदय व्यक्त केला असून, महानगरपालिकेसह सर्वांच्या सहकार्याने असे केंद्र उभारण्यात येईल.

महाराष्ट्र वित्त तंत्रज्ञान क्षेत्राची राजधानी बनला आहे. त्यामुळे आर्थिक व्यवहार आणि बँकिंग क्षेत्रात राज्य पुढे असून, आणखी पुढे नेण्यासाठी विशेष धोरण तयार केले आहे. विमा आणि डिजिटल कर्ज वितरण क्षेत्रात महाराष्ट्राने आपले वर्चस्व कायम ठेवावे, या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

### मुंबई, पुणे आघाडीवर

'मुंबई आणि पुणे देशातील वित्त तंत्रज्ञान परिसंस्थेत आघाडीवर आहेत. यंदा पहिल्या तिमाहीत मुंबईने बंगळुरूला मागे टाकले असून, एकूण वित्त तंत्रज्ञान गुंतवणुकीपैकी ६१ टक्के गुंतवणूक मुंबईत झाली आहे. वित्त तंत्रज्ञान नवउद्यमींमध्येही मोठी वाढ झाली असून, ती ५९ टक्के आहे. राज्यात ९० कोटी डॉलरची गुंतवणूक या क्षेत्रात झाली आहे. ही वित्त तंत्रज्ञान परिसंस्था नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर येथेही नेण्याची गरज आहे. लवकरच नागपूरमध्येही बजाज फिनसर्व्हची सेवा सुरू झालेली दिसेल,' असे देवेंद्र फडणवीस यांनी नमूद केले.

# इलेक्ट्रिक मोबिलिटी हीच भविष्यातील वाहतुक

## पुनावळेत 'NIA EV Excellence Centre'चे आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते उद्घाटन

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**पुनावळे येथे 'NIA EV MOTORS'च्या नवीन 'NIA EV EXCELLENCE CENTRE'चे उद्घाटन आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रातील भारतीय कंपन्यांच्या वाढत्या योगदानाचे कौतुक करत, इलेक्ट्रिक मोबिलिटी ही भविष्यातील वाहतुकीची महत्त्वाची दिशा असल्याचे आमदार शंकर जगताप यांनी नमूद केले.**



भारतीय रस्ते, ग्राहकांच्या गरजा आणि बदलते तंत्रज्ञान यांचा विचार करून आधुनिक, विश्वासार्ह आणि पर्यावरणपूरक इलेक्ट्रिक वाहने विकसित करण्याच्या दिशेने NIA EV MOTORSकडून काम सुरू आहे. वाढते प्रदूषण आणि पेट्रोल-डिझेलवरील अवलंबित्व लक्षात घेता इलेक्ट्रिक वाहनांचा स्वीकार ही केवळ पर्यावरणाची गरज नसून भविष्यातील वाहतूक व्यवस्थेतील महत्त्वाचा बदल असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

NIA EV MOTORSची स्थापना २०२४ मध्ये करण्यात आली. कंपनीकडून इलेक्ट्रिक मोबिलिटी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ग्राहकांसाठी सुरक्षित, स्मार्ट आणि विश्वासार्ह वाहने विकसित करण्यावर भर दिला जात आहे. LFP बॅटरी, IOT कनेक्टिव्हिटी आणि आधुनिक सेफ्टी तंत्रज्ञान यामुळे कंपनीची इलेक्ट्रिक वाहने तंत्रज्ञानाच्या दृष्टीने सक्षम होत आहेत.

इलेक्ट्रिक वाहनांचा विस्तार केवळ वाहन उद्योगापुरता मर्यादित राहणार नसून त्यातून बॅटरी तंत्रज्ञान, चार्जिंग सुविधा, वाहन देखभाल, सॉफ्टवेअर आणि कौशल्याधारित रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत. महाराष्ट्राची ऑटोमोबाईल क्षेत्रातील मजबूत पायाभूत क्षमता आणि EV क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञान यांची सांगड घालण्याची मोठी संधी राज्यासमोर असल्याचे आमदार जगताप यांनी सांगितले.

NIA EV MOTORSकडून महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात डीलर नेटवर्कचा विस्तार करण्यात येत असून, एक मजबूत भारतीय EV ब्रँड म्हणून कंपनीची वाटचाल सुरू आहे. भारतीय ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन परवडणारी आणि पर्यावरणपूरक इलेक्ट्रिक वाहने उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांचे आमदार शंकर जगताप यांनी कौतुक केले. यावेळी नगरसेविका रेश्मा भुजबळ, भाजपा ओबीसी मोर्चा शहराध्यक्ष चेतन भुजबळ उपस्थित होते. यावेळी कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक आलोक शेठ यांचे अभिनंदन करून कंपनीच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. भारतीय इलेक्ट्रिक वाहन उद्योगाला चालना देण्यासाठी अशा स्वदेशी कंपन्यांची भूमिका महत्त्वाची ठरणार असून, NIA EV MOTORS इलेक्ट्रिक मोबिलिटीच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करेल, असा विश्वास आमदार शंकर जगताप यांनी व्यक्त केला.

> इलेक्ट्रिक मोबिलिटी ही केवळ काळाची गरज नाही, तर भारताच्या भविष्यातील वाहतुकीची दिशा आहे. वाढते प्रदूषण, इंधनावरील खर्च आणि पेट्रोल-डिझेलवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी इलेक्ट्रिक वाहनांचा स्वीकार मोठ्या प्रमाणात होणे आवश्यक आहे. पिंपरी-चिंचवडसारख्या औद्योगिक आणि ऑटोमोबाईल हबमध्ये NIA EV MOTORSसारख्या भारतीय कंपन्यांनी अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून स्वदेशी EV उद्योगाला बळ देणे ही अभिमानाची बाब आहे. LFP बॅटरी, IOT कनेक्टिव्हिटी आणि आधुनिक सुरक्षा तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सुरक्षित, स्मार्ट आणि पर्यावरणपूरक वाहतूक व्यवस्था उभी करण्यासाठी अशा उद्योगांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. NIA EV MOTORSच्या या नव्या 'EV EXCELLENCE CENTRE'मुळे इलेक्ट्रिक वाहन क्षेत्राला आणि त्यासोबत रोजगार व पूरक उद्योगांना निश्चितच चालना मिळेल.
>
> – **शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा.**

## आमदार महेश लांडगे यांची जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या नियामक परिषदेत नियुक्ती

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या कामकाजाला अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, आमदार महेश लांडगे यांची जिल्हा खनिज प्रतिष्ठान, पुणे अंतर्गत नियामक परिषदेवर (गव्हर्निंग कौन्सिल) सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा खनिकर्म अधिकारी तथा नियामक परिषदेचे सदस्य सचिव आनंद पाटील यांनी याबाबतचे अधिकृत पत्र दिले आहे.**



महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या ४ ऑगस्ट २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. संबंधित सदस्य लोकप्रतिनिधी म्हणून कार्यरत असेपर्यंत त्यांचा नियामक परिषदेवरील कार्यकाळ कायम राहणार आहे. लोकप्रतिनिधी म्हणून असलेला कार्यकाळ संपुष्टात आल्यानंतर नियामक परिषदेवरील सदस्यत्व आपोआप संपुष्टात येणार असल्याचे शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारच्या विकासाभिमुख धोरणातून जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या माध्यमातून खनिजप्रभावित भागांमध्ये पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा आणि इतर मूलभूत सुविधांच्या विकासाला चालना देण्यावर भर दिला जात आहे. या पार्श्वभूमीवर आमदार महेश लांडगे यांच्यावर नियामक परिषदेच्या सदस्यपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

### विकासासाठी प्रभावी भूमिका

जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या निधीचा प्रभावी वापर करून खनिजप्रभावित भागांमध्ये विकासकामांना गती देण्याची मोठी जबाबदारी नियामक परिषदेवर असते. आमदार लांडगे यांच्या नियुक्तीमुळे पुणे जिल्ह्यातील अशा भागांच्या विकासाशी संबंधित प्रश्नांना अधिक प्रभावीपणे मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. "जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या माध्यमातून खनिजप्रभावित भागांमध्ये विकासकामांना गती देणे, नागरिकांना आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे आणि उपलब्ध निधीचा प्रभावी व पारदर्शक वापर सुनिश्चित करणे, ही आपली प्राथमिकता राहील. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारच्या विकासाच्या दृष्टिकोनाला पूरक काम करण्याचा माझा प्रयत्न असेल," असे आमदार महेश लांडगे यांनी सांगितले.

> "मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने विकासाला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या माध्यमातून खनिजप्रभावित भागांमध्ये मूलभूत सुविधा आणि विकासकामांना अधिक गती देण्यासाठी नियामक परिषदेवर मिळालेल्या जबाबदारीचा प्रभावीपणे उपयोग करू. खनिज निधीचा योग्य, पारदर्शक आणि लोकहितासाठी विनियोग होईल, यासाठी कटिबद्ध राहू."
>
> – **महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**



## भूमिका

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उझबेकिस्तानशी युरेनियम पुरवठ्याबाबत दीर्घ मुदतीचा करार केला हे उत्तम झाले. उझबेकिस्तान, ताजिकिस्तान, किर्गिझस्तान, कझाकस्तान इत्यादी 'स्तान' हे मध्य आशियातील नैसर्गिक साधन-संपत्तीने भरलेले देश. यातील काही इतिहासात 'सिल्क रूट' नावाने ओळखल्या जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय व्यापार मार्गावर होते.**

# इंधन मिळाले, भट्टीचे काय?



तेव्हाही या साऱ्यांशी आपण चांगले संबंध राखून होतो. पुढे यातील काही व्यापक सोव्हिएत रशियाचा भाग बनले. सोव्हिएत संघराज्याचा ऱ्हास सुरू झाल्यानंतर मिखाइल गोर्बाचेव्ह यांच्या काळात या देशांतही स्वातंत्र्याचे वारे खेळू लागले. त्या वेळी उझबेकिस्तानही स्वतंत्र झाला. त्यास लगेच मान्यता देणाऱ्यांत आपण एक होतो. त्यामुळे उझबेकिस्तान आणि भारत यांच्यातील ऐतिहासिक नातेसंबंधांचे पुनरुज्जीवन झाले.

ताश्कंद ही या देशाची राजधानी बहुतेकांस परिचित असेल. अभ्यासू जनांस हे शहर सुफी संत परंपरेच्या अनुषंगाने ठाऊक असेल आणि प्रचारात वाहून जाणाऱ्यांस लाल बहादूर शास्त्री यांचे निधन-स्थळ व त्यामागील कटकारस्थानांच्या हास्यास्पद कहाण्यांसाठी तरी या शहराचे नाव कानांवरून गेले असेल. आपण ऐतिहासिक संबंध राखून आहोत अशा या देशाशी पंतप्रधान मोदी यांनी युरेनियम पुरवठ्यासाठी करार केला. या जुन्या संबंधांस त्यामुळे अधिक बळकटी येईल. वास्तविक उझबेकिस्तानाकडून सध्याही आपण युरेनियम घेतोच. तो करार २०२६ साली, म्हणजे यंदा, संपुष्टात आला असता. पंतप्रधानांच्या पुढाकाराने त्यास मुदतवाढ मिळाली. त्याची गरज होती.

या कराराचे महत्त्व दोन कारणांसाठी. पहिले म्हणजे मध्य आशियातील बहुतांश देश इकडे आड तिकडे विहीर याप्रमाणे इकडे पुतिन-चीनचे क्षी जिन पिंग आणि दुसरीकडे गोंधळलेला युरोप अशा कात्रीत सापडलेले आहेत. पुतिन जेवू घालत नाहीत आणि ट्रम्प भीक मागू देत नाहीत, अशी ही कोंडी. त्यामुळे या देशांना एक सक्षम आणि समर्थ व्यापारी भागीदाराची गरज आहे. आपल्या बाजारपेठेची वाढती भूक लक्षात घेता तो पर्याय आपण असू शकतो. त्यांची ही गरज ओळखून आपण त्या देशांस अधिकाधिक व्यापार जाव्यात ओढणे इष्ट. ताजा करार हे त्या दिशेने टाकलेले एक पाऊल ठरू शकेल. दुसरे कारण आपली युरेनियम गरज; हे.

आपल्या देशास इंधन अनुपलब्धतेचा शाप आहे. त्यामुळे खनिज तेल असो; चांगल्या दर्जाचा कोळसा वा युरेनियम. आपणास सगळेच आयात करावे लागते. हेच वास्तव लक्षात घेऊन माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी अमेरिकेशी अणुकरार केला. त्यासाठी आपले राजकीय स्थैर्य पणाला लावले. त्या कराराआधी आपल्या १७ पैकी ११ अणुभट्ट्या क्षमतेपेक्षा निम्मीच वीजनिर्मिती करीत होत्या. नंतर युरेनियम मिळू लागल्याने त्यांची कार्यक्षमता थेट ८२ टक्क्यांवर गेली. तद्नंतर आपण ऑस्ट्रेलिया, कॅनडा आदी देशांशीही अणुइंधन पुरवठ्यासंदर्भात करार केले. तथापि तरीही एकदेखील नवा अणुऊर्जा प्रकल्प आपण सुरू करू शकलेलो नाही. कारण महत्त्वाचा मुद्दा विम्याचा. अणुभट्टीत अपघात झाल्यास कोणी किती नुकसानभरपाई द्यायची यासंदर्भात सर्वमान्य नियमावली तयार करण्यात बराच विलंब झाला.

## प्रासंगिक »

### मुलगा-मुलगी समानच!

**एका गावात गणपत नावाचा शेतकरी राहत होता. त्याला दोन मुली होत्या. गावातील काही लोक त्याला म्हणायचे, "मुलगा असता तर म्हातारपणी आधार झाला असता." गणपत मात्र शांतपणे उत्तर द्यायचा, "माझ्या मुलीच माझी खरी ताकद आहेत."**

एकदा गणपत आजारी पडला. शेतातील कामे थांबण्याची वेळ आली. त्याच्या दोन्ही मुलींनी शिक्षण सांभाळत शेताची जबाबदारी घेतली. त्यांनी मेहनत करून पीक वाचवले. काही दिवसांनी गणपत बरा झाला.

गावातील त्याच लोकांनी गणपत-ला विचारले, "तुझ्या मुलींनी एवढे सगळे कसे केले?" गणपत हसून म्हणाला, "मु-लगा-मुलगी असा भेद आपण करतो; कष्ट, प्रेम आणि जबाबदारी यांना लिंग नसते."

काही वर्षांनी त्याच्या मोठ्या मुलीने गावात मुलींसाठी वाचनालय सुरू केले. धाकटीने महिलांना स्वावलंबी बनवण्या-साठी प्रशिक्षण केंद्र सुरू केले. गावातील अनेक कुटुंबांची विचारसरणी बदलली. त्या दिवशी ग्रामसभेत गणपत म्हणाला, "ज्या समाजाला मुलगी नको असते, तो समाज स्वतःचे भविष्य नाकारत असतो."

- तात्पर्य : मुलगा-मुलगी समान; भेदभाव नको.

'आयआयटी' म्हणजेच इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या राष्ट्रीय स्तरावरील अग्रणी तंत्रज्ञान-अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्थेने नव्यानेच दोन मोठे धोरणात्मक निर्णय घेतले असून त्याचे दूरगामी स्वरुपात परिणाम होऊ शकतात.

# आयआयटीचे मोठे धोरणात्मक निर्णय




नव्या व बदलत्या शैक्षणिक-व्यावसायिक संदर्भात आयआयटीच्या या निर्णयांचे संस्थेच्या विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या रोजगार संधी देणाऱ्या व्यवस्थापन-कंपन्या व त्याचवेळी संस्थेच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक मूल्यांकन व श्रेणी या उभयसंदर्भात परिणामकारक असल्यानेच आयआयटीच्या या निर्णयांना नवे संदर्भ व महत्त्व प्राप्त झाले आहे.

आ यआयटीच्या विद्यार्थ्यांची विविध प्रतिष्ठित उद्योग-व्यवसायांमध्ये रोजगार संधी मिळवून देण्यासाठी संपर्क, समन्वयाचे महत्त्वपूर्ण काम वर्षानुवर्षे करणाऱ्या 'प्लेसमेंट पॅनेल'ने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयानुसार आयआयटीच्या पदवी वा पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची चाचणी, मुलाखत अशी निवड प्रक्रिया पार पाडून त्याद्वारे विद्यार्थ्यांची निवड निश्चिती करणाऱ्या कंपन्या त्यांनी निवड केलेल्या विद्यार्थी-उमेदवारांना त्यांच्या निवडीचे रितसर पत्र देत असत. त्यानुसार निवड झालेले आयआयटीचे विद्यार्थी संबंधित कंपनीत रुजू होत असत. मात्र गेल्या काही वर्षात आयआयटीच्या विद्यार्थ्यांची निवड करून त्यानुसार त्यांना पूर्व-सूचित करणाऱ्या कंपन्यांपैकी काही कंपन्या अचानकपणे व कुठलीही पूर्व सूचना न देता अशा विद्यार्थ्यांचे नेमणूक पत्र रद्द करण्याचे प्रकार घडले व त्यामध्ये वाढ पण होत गेली. या प्रकाराने विद्यार्थ्यांच्या करिअरच्या सुरुवातीलाच गोंधळ व अस्थिरतेची स्थिती निर्माण होत असे. या मुद्याची आता गंभीर दखल आयआयटीच्या प्लेसमेंट पॅनेलने घेतली असून कंपन्यांनी असे प्रकार करू नयेत, यासाठी कंपन्यांना आग्रहपूर्वक सूचित केले आहे.

या संदर्भातील महत्त्वाची बाब म्हणजे देशांतर्गत सध्या कार्यरत असणाऱ्या आयआयटीच्या 23 शिक्षण संस्था आहेत. या सर्व संस्थांच्या प्रशिक्षार्थी व विद्यार्थी प्रशिक्षण विभागांच्या उच्चस्थ मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार देशातील 10 कंपन्यांना त्यांनी आयआयटीच्या विद्यार्थ्यांच्या निवडीच्या संदर्भात दिलेले निवडपत्रानुसार या विद्यार्थ्यांना ठरल्याप्रमाणे रुजू करून घेण्यास सांगितले आहे. कंपन्यांनी असे न केल्यास अशा विद्यार्थ्यांना तीन महिन्याच्या प्रस्तावित पगारा एवढी रक्कम भरपाई स्वरुपात देण्यासंबंधी सूचित करण्यात आले असून आयआयटीच्या या सूचनांचे पालन न करणाऱ्या कंपन्यांना यापुढे आयआयटीच्या कुठल्याही संस्था वा विद्या शाखेत विद्यार्थ्यांच्या निवडीसाठी येण्यास मज्जाव करण्यात येईल, अशी रोखठोक भूमिका यासंदर्भात घेण्यात आली आहे.

## ।। अभंगवाणी ।।



श्वान शीघ्रकोपी ।
आपणा घातकर पापी ॥१॥

नाहीं भीड आणि धीर ।
उपदेश न जिरे क्षीर ॥धृ. ॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.


# विद्यानंद बापटांच्या भूमिकेला पाठिंबा

## महाराष्ट्रात 'डीजे बंदी'ची शिवसेना ठाकरे गटाची मागणी; संजय राऊत

**महाईन्यूज । मुंबई**

**सण-उत्सवांमध्ये वाजणाऱ्या डीजेच्या आवाजावरून महाराष्ट्रात नवा राजकीय आणि सामाजिक वाद पेटला आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी राज्यातील 'डीजे' संस्कृतीवर पूर्णपणे बंदी घालण्याची मागणी केली आहे. केवळ चर्चेचे गुऱ्हाळ न घालता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट मंत्रिमंडळ बैठकीत यावर निर्णय घ्यावा, अशी मागणी राऊत यांनी केली आहे. या संदर्भातील वृत्त 'हिंदूस्तान टाइम्स' या वृत्तसंस्थेने दिले आहे.**





मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी 'डीजे' संस्कृतीला विरोध दर्शवत सण-उत्सव पारंपरिक पद्धतीने साजरे करण्याचे आवाहन केले होते. तसेच या विषयावर समाजात संवादाच्या माध्यमातून एकवाक्यता आणि सर्वसंमती घडवून आणली पाहिजे, असे मत व्यक्त केले होते.

"रहिवासी भागातील डीजेच्या कर्णकर्कश आवाजामुळे नागरिकांचे आरोग्य, ऐकण्याची क्षमता आणि रक्तदाबावर अत्यंत गंभीर परिणाम होत आहेत. त्यामुळेच बापट यांच्या भूमिकेला जनतेचा पाठिंबा मिळतोय. मुख्यमंत्र्यांनी केवळ संवादाच्या गप्पा न मारता राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत डीजेबंदीचा कडक निर्णय घ्यावा."

राऊत यांनी पुढे टोला लगावला की, "टॅक्सी-रिक्षा चालकांना मराठी शिकण्यासाठी एक वर्षाची सूट देण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी एकाच बैठकीत तातडीने घेतला. मग डीजेबंदीसारख्या आरोग्याशी निगडित महत्त्वाच्या विषयावर निर्णय घेताना सर्वसंमतीची वाट कशासाठी पाहावी?"

तसेच मुख्यमंत्र्यांना संवादाची एवढीच आवड असेल, तर गेल्या आठवड्यापासून उपोषणाला बसलेले मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्याशी सरकार अजून संवाद का साधत नाही? असा रोखठोक सवालही राऊत यांनी उपस्थित केला.

मूर्खाला शहाण्या माणसाने काही सांगण्याचा प्रयत्न केला, तर हे लोक त्याला 'दिमागी नक्षलवादी' ठरवत आहेत. "राज्यात, विशेषतः पुण्यात मूर्खांचा कारभार सुरू आहे," अशी टीका संजय राऊत यांनी केली. ज्या पुण्याने या महाराष्ट्रात आणि संपूर्ण देशात सामाजिक सुधारणेचा पाया घातला, तिथे आज हे होत आहे, असे राऊत म्हणाले. राऊत यांच्या या टीकेमुळे डीजेबंदीच्या मुद्द्यावर राज्य सरकारची भूमिका आता अधिक स्पष्ट होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### राज्यात पेटला वाद

गणेशोत्सवासह इतर सण आणि मिरवणुकांमध्ये डीजेच्या कर्णकर्कश आवाजाचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. पुण्यातील विद्यानंद बापट यांनी डीजेच्या आवाजाला विरोध केला असता गुरुवारी (५ सप्टेंबर) त्यांच्यावर हल्ला झाला होता. या घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्रात डीजेविरोधातील हा वाद अधिक तीव्र झाला आहे. याप्रकरणी पुणे न्यायालयाने शुक्रवारी आरोपी संतोष शंकर चव्हाण याला एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. दुसरीकडे, नागपूर पोलिसांनी ध्वनिप्रदूषणाचा हवाला देत सण-उत्सवांदरम्यान डीजे आणि मोठ्या साउंड सिस्टीमवर आधीच बंदी घातली आहे.

## मनोज जरांगे यांनी टोकाचे पाऊल उचलू नये; राधाकृष्ण विखे यांचे आवाहन

**महाईन्यूज । राहाता**

**मराठा आरक्षणाच्या प्रश्नाबाबत मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या सर्व मागण्यांची दखल राज्य सरकारने घेतली आहे. न्यायालयीन प्रक्रियेत सर्व निर्णय टिकावेत म्हणून कायदेशीर बाबी तपासून त्यावर कार्यवाही सुरू करून त्यांना आश्वासित केले आहे. मात्र, त्यांनी पुन्हा उपचार घेण्यास नकार देऊन टोकाचे पाऊल उचलू नये, असे आवाहन जलसंपदा मंत्री तथा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे यांनी आज शनिवारी प्रवरानगर येथे माध्यमांशी बोलताना केले.**



विखे म्हणाले, अंतरवाली सराटी येथे जाऊन जरांगे पाटील यांच्या प्रत्येक मागण्यांवर सरकारने त्यांच्याशी चर्चा केली आहे. प्रशासकीय स्तरावर त्याची प्रक्रियाही सुरू झाली असून, निवृत्त न्यायमूर्ती शिंदे यांच्या दौऱ्यांचे नियोजनही करण्यात आले आहे. या माध्यमातूनही जात प्रमाणपत्रांच्या अडचणी दूर करण्यात उपलब्धता होईल. मात्र, सर्व सकारात्मक गोष्टी सुरू असताना त्यांनी आज अचानक उपचारांना दिलेला नकार पाहता, शासनाने त्यांच्या सर्व मागण्यांचा आदर केला आहे, त्यांना मी पुन्हा विनंती करतो की टोकाचे पाऊल उचलू नये; शासन तुमच्या मागण्यांबाबत सकारात्मक विचार करीत आहे. यासंदर्भात मी आणि अधिकारी पुन्हा त्यांना भेटायला तयार आहे.

ज्येष्ठ मंत्री छगन भुजबळ यांनी केलेल्या वक्तव्यावर भाष्य करताना मंत्री विखे म्हणाले की, ओबीसींच्या आरक्षणाला कुठेही धक्का लागणार नाही, त्यांच्या कुठलीही योजना बंद होणार नाही, हीच आमची भूमिका आहे. त्यांनी गैरसमज करुन घेऊ नये. मराठा समाजासाठी संघर्ष करणारे मनोज जरांगे यांच्या तोंडातून अनवधानाने काही शब्द निघून जातात, मात्र ते समाजासाठी बोलत असतात. त्यात वैयक्तिक राग मानण्याचे कारण नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राज्यातील आदिवासी आश्रमशाळांच्या दुरावस्थेचा विषय राज्य सरकारने अतिशय गांभीर्य घेतले आहे. मागील वर्षभरात आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी याबाबत संवेदनशीलतेने कार्यवाही सुरू केली आहे. समोर आलेल्या प्रसंगानुसार तात्काळ सुधारणाही होत आहे, भविष्यकाळात आदिवासी आश्रमशाळांच्या बाबतीत चांगले चित्र पाहायला मिळेल, दुर्लक्षित झालेला आदिवासी विभाग अधिक चांगले काम करीत आहे, असा विश्वास विखे यांनी व्यक्त केला.

राज्यात गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर डीजे वाजविण्याच्या संदर्भात सुरू असलेल्या चर्चेवर प्रतिक्रिया व्यक्त करताना विखे म्हणाले की, या प्रश्नावर चर्चा करून सामोपचाराने मार्ग काढला पाहिजे. हिंदूंचे सण आले की बंदीचा विषय सुरू होतो, इतर समाजाच्या वेळी मात्र चर्चा होत नाही; या दुजाभावाची चीड समाजात आहे. डीजे वाजविण्याच्या संदर्भात समान धोरण आखण्याची आवश्यकता असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

# पाकिस्तानमध्ये मोठी राजकीय घडामोड

## लष्करप्रमुख असीम मुनीर यांच्या हातात तिन्ही सैन्यदलांची सूत्रे, अण्वस्त्रांवरही ताबा

**महाईन्यूज । पाकिस्तान**

**पाकिस्तानात लष्कराचे वर्चस्व अधिक बळकट करणारा एक ऐतिहासिक आणि वादग्रस्त निर्णय घेण्यात आला आहे. देशाच्या इतिहासात प्रथमच एकाच लष्करी अधिकाऱ्याकडे भूदल, नौदल आणि हवाई दल अशा तीनही सैन्यदलांची कायदेशीर कमान सोपवण्यात आली आहे. पाकिस्तानच्या संसदेने 'डिफेन्स फोर्सेस ऑफ पाकिस्तान ॲक्ट, २०२६' हा कायदा मंजूर केला असून, त्यांतर्गत 'चीफ ऑफ डिफेन्स फोर्सेस' (सीडीएफ) या सर्वोच्च पदाची निर्मिती करण्यात आली आहे.**



फील्ड मार्शल असीम मुनीर हे पाकिस्तानचे पहिले सीडीएफ बनले असून ते लष्करप्रमुखपदासोबतच या नव्या पदाची धुरा सांभाळतील. द इंडियन एक्सप्रेसने यासंबंधीचे वृत्त दिले आहे. १९७६ नंतर पाकिस्तानच्या लष्करी रचनेत झालेला हा आतापर्यंतचा सर्वात मोठा फेरबदल मानला जात आहे. यापूर्वी तीनही दलांमध्ये समन्वयासाठी 'चेअरमन ऑफ द जॉइंट चीफ्स ऑफ स्टाफ कमिटी' हे पद अस्तित्वात होते. मात्र त्या पदाला नौदल किंवा हवाई दलाला थेट निर्णय देण्याचे कायदेशीर अधिकार नव्हते. नव्या 'सीडीएफ' पदामुळे मुनीर यांना तीनही दलांवर थेट ऑपरेशनल कमांड मिळाली आहे.

या पुनर्रचनेमुळे सरकारचे लष्करावरील नियंत्रण कमकुवत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. माजी लष्करी अधिकारी आणि विधिज्ञ कर्नल इनाम रहीम यांनी दिलेल्या माहितीनुसार, आता सीडीएफ केवळ एका पत्राद्वारे कोणत्याही अधिकाऱ्याची हकालपट्टी करू शकतात; त्यासाठी यापूर्वी आवश्यक असणाऱ्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या मंजुरीची आता गरज उरलेली नाही. एकाच पदाच्या इतर दोन दलप्रमुखांना लष्करप्रमुखांच्या हाताखाली दुय्यम स्थान दिल्याचा आक्षेपही वकिलांकडून नोंदवला जात आहे. ब्रिटन, कॅनडा आणि ऑस्ट्रेलियासारख्या देशांमध्ये अशा प्रकारची पदे असली, तरी तिथे तीन दलांच्या प्रमुखांना आलटून-पालटून संधी दिली जाते; पाकिस्तानात मात्र ही सर्व सत्ता कायमस्वरूपी केवळ लष्करप्रमुखांच्या हातात केंद्रीत करण्यात आली आहे. दरम्यान या फेरबदलाचे पाकिस्तान सरकारने समर्थन केले आहे. भूदल, नौदल, हवाई दल याबरोबरच सायबर आणि ड्रोन मोहिमांमध्ये सुसूत्रता आणणे, तीनही दलांमधील दरी मिटवणे आणि युद्धासारख्या आणीबाणीच्या प्रसंगी तात्काळ निर्णय घेणे शक्य व्हावे, यासाठीच सर्व दलांचे नियंत्रण एका कमांडरकडे सोपवण्यात आल्याचे स्पष्टीकरण प्रशासनाकडून देण्यात आले आहे.

### अण्वस्त्रांवरील नियंत्रणही लष्कराकडेच

या निर्णयामुळे पाकिस्तानातील संरक्षण तज्ज्ञांमध्ये दोन गट पडले आहेत. नव्या कायद्यानुसार देशाच्या अण्वस्त्र कमांडचे प्रमुखपद आता केवळ लष्कराच्या अधिकाऱ्याकडेच राहील, अशी तरतूद करण्यात आली आहे. रावळपिंडीतील एका निवृत्त थ्री-स्टार जनरलने अल जझीराला दिलेल्या माहितीनुसार, नवी रचना पूर्णपणे 'लष्करकेंद्री' असून नौदल आणि हवाई दलातील अधिकाऱ्यांच्या पदोन्नती व निर्णय प्रक्रियेवर आता लष्कराचाच प्रभाव राहील. दुसरीकडे, निवृत्त जनरल नईम खालिद लोधी यांनी या बदलाचे समर्थन केले आहे.

# IAS अधिकारी असल्याचं भासवून नवऱ्यासह अनेकांना गंडवलं; रीलमुळे फुटलं बिंग

**महाईन्यूज । मध्य प्रदेश**

**स्वतःला आयएएस अधिकारी असल्याचे भासवून अनेकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या एका उच्चशिक्षित तोतया महिला अधिकाऱ्याला अटक करण्यात आली आहे. तृप्ती सिंह राजपूत (वय ३०) असे अटक केलेल्या संशयित महिलेचे नाव आहे. मध्य प्रदेश विधानसभेच्या आवारात एक रील चित्रीत केल्याचा तिचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर हे प्रकरण उजेडात आले.**






हा व्हिडिओ सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरला होता. भोपाळ पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण केले असता, हा व्हिडिओ विधानसभेचा नसून शहरातील एका मानवाधिकार संग्रहालयाच्या गॅलरीतील असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी संबंधित तरुणींची चौकशी केली असता, लाल साडीतील तृप्ती राजपूत हिनेच आपल्याला 'आयएएस' अधिकारी म्हणून वावरण्यास सांगितले असल्याचे त्यांनी उघड केले.

पोलिसांच्या चौकशीत अनेक थक्क करणारे प्रसंग समोर आले आहेत. केवळ सोशल मीडियावर प्रसिद्धी मिळवणे हाच तृप्तीचा हेतू नव्हता, तर या तोतयागिरीच्या जोरावर तिने अनेकांना गंडा घातल्याचे समोर आले आहे. मध्य प्रदेश पर्यटन विभागात 'अतिरिक्त संचालक' पदावर कार्यरत असल्याचे भासवून तिने बेरोजगार तरुणांना सरकारी नोकऱ्यांचे, तर व्यावसायिकांना पर्यटन विभागाचे हॉटेल्स लीजवर देण्याचे आमिष दाखवले होते.

भोपाळचे पोलीस उपायुक्त विकास कुमार सहवाल यांनी द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना सांगितले की, व्हिडिओमध्ये दिसणाऱ्या दोन महिलांचीही तृप्तीने फसवणूक केली होती. त्यांनाही स्वतःसारखे आयएएस अधिकारी बनवण्याचे प्रलोभन दाखवून तृप्तीने त्यांच्याकडून प्रत्येकी ३ लाख रुपये उकळले होते. धक्कादायक बाब म्हणजे तृप्तीने स्वतःच्या पतीलाही गंडवले होते. आपण आयएएस अधिकारी असल्याचा बनाव रचून पतीला लग्नासाठी तयार केले होते, असा दावा तिच्या पतीने केला असून सध्या त्यांच्यात कौटुंबिक वाद सुरू आहेत. पोलिसांनी तृप्तीच्या भोपाळ येथील घरावर छापा टाकला असता, प्रशासकीय यंत्रणेलाही थक्क करणारे पुरावे हाती आले. तिच्या घरातून बनावट सरकारी ओळखपत्रे, शासकीय लेटरहेड्स, नियुक्तिपत्रे, 'प्रशिक्षणार्थी आयएएस' असा उल्लेख असलेली सन्मानचिन्हे आणि भारत सरकारचा फलक लावलेली एक टोयोटा इनोव्हा कार जप्त करण्यात आली. अशोकनगर जिल्ह्यातील ऐतिहासिक चंदेरी येथील एका शासकीय विश्रामगृहात (किला कोठी) तृप्तीने तिच्या साथीदारांसह मुक्काम केला होता. तिथे तिने चार स्थानिक तरुणांना केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयात नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून तब्बल ९ लाख ८० हजार रुपये आणि मूळ कागदपत्रे उकळली होती. नोकरी न मिळाल्याने तरुणांनी संशय घेऊन पोलिसांत धाव घेतली.

### नेमके प्रकरण काय?

काही दिवसांपूर्वी सोशल मीडियावर एक व्लॉग (व्हिडिओ) चांगलाच व्हायरल झाला होता. त्यामध्ये गुलाबी रंगाची साडी परिधान केलेली एक तरुणी कॅमेऱ्यासमोर आत्मविश्वासाने बोलताना दिसत होती. "आम्ही मध्य प्रदेश विधानसभेत आलो आहोत. आत चित्रीकरणाला परवानगी नसल्याने आम्ही बाहेर हा व्हिडिओ बनवत आहोत," असे सांगत ती कॅमेरा तिच्या इतर दोन मैत्रिणींकडे वळवते. त्यातील लाल साडी नेसलेली महिला हसत म्हणते, "आमच्या या खोड्या पाहून आम्ही दोघी 'आयएएस' अधिकारी आहोत यावर कोणाचा विश्वास बसेल का?"



# यामी गौतमची 'नई नवेली'!

अभिनेत्री यामी गौतमचा नवा चित्रपट 'नई नवेली'ची घोषणा झाली आहे. हा एक कौटुंबिक मनोरंजन करणारा चित्रपट असून तो दसऱ्याच्या सणावेळी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाची निर्मिती आनंद एल. राय आणि हिमांशु शर्मा यांनी केली आहे. तर दिग्दर्शनाची धुरा बालाजी मोहन यांनी सांभाळली आहे. अमेझॉन एमजीएम स्टुडिओज आणि कलर येल्लोने 'नई नवेली' चित्रपटाची घोषणा केली आहे. हा चित्रपट 16 ऑक्टोबर रोजी प्रदर्शित होणार आहे. अमेझॉन एमजीएम स्टुडिओजने एक व्हिडिओ शेअर केला असून यात यामी ही लाल रंगाच्या साडीत नटून थटून दिसून येते, यानंतर हसत ती एकाच्या गळ्यात ओढणी अडकवून खेचत असल्याचे दाखविण्यात आले आहे. तर व्हिडिओच्या कॅप्शनदाखल 'नई नवेली दुल्हन डायन' अशी कॅप्शन देण्यात आली आहे. या चित्रपटाला जी.व्ही. प्रकाश कुमार यांचे संगीत लाभले आहे. हा चिर्प्ट प्रेक्षकांना असाधारण घटना घडणाऱ्या आणि कौटुंबिक उलथापालथीशी टक्कर देणाल्या जगात घेऊन जातो. चित्रपटाच्या कहाणीत अनेक रंजक अन् अनपेक्षित वळणं आहेत. चित्रपटात हॉररसोबत कॉमेडीचा डोसही मिळणार आहे. चित्रपटाची कहाणी मेरठच्या एका घरात आलेल्या सुनेवर आधारित आहे, जी चेटकिण असल्याचा संशय असतो. मेरठच्या एका अस्त-व्यस्त घरात एक आदर्श सून येते, या घराचे रुप ती पालटून टाकते, परंतु तेव्हा तिच्या दीराला ही सून प्रत्यक्षात एक चेटकीण असू शकते असा संशय वाटू लागतो.



# पार्वतीची 'कॅप्टन इंडिया'मध्ये एन्ट्री!

अभिनेता कार्तिक आर्यनचे नाव दीर्घकाळापासून 'कॅप्टन इंडिया'वरून चर्चेत आहे. सुमारे 5 वर्षांपूर्वी या चित्रपटाची घोषणा झाली होती. मधल्या काळात हा चित्रपट गुंडाळला गेल्याची चर्चा होती. परंतु आता याच्या निर्मितीने वेग पकडला आहे. चित्रपटासाठी नव्या नायिकेची निवड निर्मात्यांनी केली आहे. मागील काही काळापासून अनेक दाक्षिणात्य कलाकार बॉलिवूडमध्ये काम करत आहेत. आता यात अभिनेत्री पार्वती थिरुवोथूचे नाव जोडले गेले आहे. कार्तिक आर्यनसोबत ती कॅप्टन इंडिया चित्रपटात दिसून येणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन शिमित अमीन करणार आहे. शिमित यांना चक दे इंडिया चित्रपटासाठी ओळखले जाते. कॅप्टन इंडिया चित्रपटात पार्वती महत्त्वाच्या भूमिकेत असणार आहे. परंतु तिच्या पात्राविषयी अद्याप अधिक माहिती समोर आलेली नाही. प्रामुख्याने मल्याळी अन् तमिळ चित्रपटांमध्ये काम करणाऱ्या पार्वतीने 2017 साली 'करीब करीब सिंगल' चित्रपटाद्वारे बॉलिवूडमध्ये पाऊल ठेवले होते. अशास्थितीत आता जवळपास 9 वर्षांच्या प्रतीक्षेनंतर ती बॉलिवूडमध्ये परतण्यास तयार आहे.



# अभिनेत्री हृता दुर्गुळेचा हटके लूक...

मराठी चित्रपट आणि मालिका विश्वात आपल्या अभिनयाने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारी अभिनेत्री हृता दुर्गुळे पुन्हा एकदा एका नव्या आणि वेगळ्या रूपात प्रेक्षकांच्या भेटीला येण्यासाठी सज्ज झाली आहे. तिने सोशल मीडियावर तिच्या आगामी प्रोजेक्टचे खास पोस्टर शेअर केले असून, तिचा हा नवीन लूक सध्या नेटिझन्स आणि तिच्या चाहत्यांमध्ये कौतुकाचा विषय ठरत आहे.

नव्या पोस्टरमधील हृताचा लूक विशेष लक्ष वेधून घेणारा आहे. तिने शाळेचा गणवेश परिधान केला असून गळ्यात टाय, डोक्यावर दोन वेण्या आणि चेहऱ्यावर एक गोड हसू दिसते. पोस्टरमध्ये सारंग साठ्येही हसताना दिसत असून, त्याने कानावर जास्वंदीचे फूल अडकवले आहे आणि हृताचे कान पकडले आहेत. या फोटोतील सर्वात मोठी विशेष बाब म्हणजे हृताचे कान असामान्यपणे मोठे दाखवण्यात आले आहेत, जे पाहून चाहत्यांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. या गमतीशीर पोस्टरवरून ही कलाकृती मनोरंजक आणि रंजक असणार असा अंदाज बांधला जात आहे.

या चित्रपटाचे नाव 'आली मोठी शहाणी' असे असून, पोस्टरसोबत हृताने एक सुंदर आणि भावुक कॅप्शनही लिहिले आहे. तिने लिहिले, "लहान असो वा मोठा, आपण सगळेच बाप्पाकडे काही ना काही मागत असतो आणि तोही मोठ्या मनाने आपल्याला नेहमी मदत करत असतो." तिच्या या पोस्टर चाहत्यांकडून आणि मराठी कलाविश्वातील कलाकारांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. हृता आणि सारंग साठ्ये ही जोडी मोठ्या पडद्यावर कोणती नवी धमाल घेऊन येते, हे पाहण्यासाठी प्रेक्षक आता उत्सुक झाले आहेत.

# ‘खराब’ कामगिरीनंतरही झ्वेरेव विजयी

## अमेरिकन टेनिस स्पर्धेत सलग दुसर्या फेरीतील संघर्षामुळे नाखुश

**महाईन्यूज । न्यूयॉर्क**

**ग्रँडस्लॅम कारकीर्दीत प्रथमच अग्रमानांकित म्हणून खेळणार्या जर्मनीच्या ॲलेक्झांडर झ्वेरेवला अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत सलग दुसर्या सामन्यात पाच सेटपर्यंत झुंजावे लागले. यानंतरही झ्वेरेवला विजय मिळवण्यात यश आले. मात्र, याबाबत तो फारसा समाधानी नव्हता. दुसर्या फेरीतील लढतीत माझी कामगिरी अत्यंत ‘खराब’ होती, असे सामन्यानंतर झ्वेरेव म्हणाला.**



फ्रेंच स्पर्धेतील विजेतेपदानंतर झ्वेरेवकडून अपेक्षा वाढल्या. अमेरिकन स्पर्धेतही त्याने आगेकूच कायम राखली असली, तरी अद्याप त्याला सर्वोत्तम खेळ करता आलेला नाही. पहिल्या फेरीत त्याला लॉरेन्झो सोनेगोने पाच सेट झुंजवले. आता दुसर्या फेरीत फ्रान्सच्या क्वेंटिन हॅलिसने पुन्हा एकदा पाच सेटपर्यंत त्याच्या क्षमतेची कसोटी पाहिली. झ्वेरेवने ही लढत ६-४, ४-६, ७-६ (७-३), ६-७ (३-७), ६-३ अशी जिंकली. झ्वेरेव एकंदर कामगिरीबाबत नाखुश असला, तरी विजय मिळवणे सर्वांत महत्त्वाचे असे सांगत त्याने लवकरच सर्वोत्तम लय मिळण्याचा विश्वास व्यक्त केला.

“मला पहिल्या दोन लढतींत संघर्ष करावा लागला हे खरे असले, तरी शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या मी चांगल्या स्थितीत आहे. मी खराब खेळूनही जिंकत आहे. जेव्हा तुम्ही सर्वोत्तम टेनिस खेळत नसता, तेव्हा कसे जिंकायचे हे माहीत असणे हे देखील एक कौशल्य आहे. मी सध्या याच गोष्टीवर पकड मिळवली आहे. लवकरच मी सर्वोत्तम लयीत खेळताना दिसेन,” असे झ्वेरेव म्हणाला.

“अमेरिकन टेनिस स्पर्धा माझ्यासाठी नेहमीच आव्हानात्मक ठरली आहे. येथील परिस्थितीमुळे इथे चांगला खेळ करणे खरोखर कठीण जाते. मात्र, मी यातून मार्ग काढेन,” असेही झ्वेरेवने सांगितले. तिसर्या फेरीत त्याची चिलीच्या अलेहांद्रो ताबिलोशी गाठ पडेल.

### ॲलेक्स डी मिनौरचा पराभव

ऑस्ट्रेलियाच्या सहाव्या मानांकित ॲलेक्स डी मिनौरला पराभवाचा सामना करावा लागला. दुसर्या फेरीत बोटिक व्हॅन डी झँडशुल्प याने मिनौर याला ६-४, ७-५, ६-२ असे नमवले. महिला एकेरीत एलिना रायबाकिनाने स्पेनच्या जेसिका बौझास मनेरियोचा ६-२, ६-४ असा पराभव केला. अमेरिकेच्या कोको गॉफने स्पेनच्याच पाओला बाडोसावर ६-४, ७-६ (७-५) अशी मात केली.

## भारत आणि जपान संघांमध्ये खेळवला जाणार टी-२० सामना; BCCIची घोषणा

**महाईन्यूज । बेंगळुरू**

**BCCIने आढावा बैठकीत आश्वासन दिल्याप्रमाणे पहिल्या गोष्टीची अंमलबजावणी केली आहे. यासाठी बीसीसीआयने शुक्रवारी, ४ सप्टेंबर रोजी एक महत्त्वाची घोषणा केली. बीसीसीआयच्या माहितीनुसार, आशियाई क्रीडा स्पर्धेतील आपल्या मोहिमेची सुरुवात करण्यापूर्वी भारतीय पुरुष क्रिकेट संघ जपानविरुद्ध एक ऐतिहासिक टी-२० सामना खेळणार आहे.**






आशियाई क्रीडा स्पर्धेतील भारताचा पहिला सामना २८ सप्टेंबर रोजी होणार असून, जपानविरुद्धचा सामना त्याआधी बरोबर सहा दिवस म्हणजेच २२ सप्टेंबर रोजी खेळवला जाईल. पुरुष क्रिकेटच्या इतिहासात भारत आणि जपानचे संघ आमनेसामने येण्याची ही पहिलीच वेळ असेल.

भारत आणि जपान यांच्यातील टी-२० आंतरराष्ट्रीय सामना २२ सप्टेंबर २०२६ रोजी खेळवला जाणार आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (BCCI) आणि जपान क्रिकेट असोसिएशनने शुक्रवारी संयुक्त निवेदनाद्वारे याची माहिती दिली. ‘सुजुकी कप’साठी होणारा हा सामना जपानमधील तोचिगी प्रांतातील सानो इंटरनॅशनल क्रिकेट ग्राउंडवर खेळवला जाणार असून, भारतीय वेळेनुसार सकाळी ९.३० वाजता सामना सुरू होईल.

दोन्ही क्रिकेट बोर्डांनी दिलेल्या माहितीनुसार, हा सामना ‘Sport 75’ या उपक्रमाची सुरुवात करणार आहे. भारत आणि जपान यांच्यातील क्रीडा क्षेत्रातील सहकार्य आणि लोकांमधील परस्पर संबंध वाढवण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. जपानचे पंतप्रधान साने ताकाइची आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात झालेल्या शिखर बैठकीत झालेल्या करारातून या उपक्रमाची कल्पना पुढे आली आहे.

भारताने २०३६चे ऑलिम्पिक आणि पॅरालिम्पिक स्पर्धांचे यजमानपद मिळवण्याची इच्छा व्यक्त केली आहे, हे लक्षात घेऊन ‘Sport 75’च्या माध्यमातून भारत-जपानमधील क्रीडा क्षेत्रातील सहकार्य आणखी मजबूत करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

BCCIचे सचिव देवजीत सैकिया यांनी भारताचा क्रिकेट संघ जपानमध्ये जाऊन टी-२० सामना खेळणार असल्याबद्दल आनंद आणि अभिमान व्यक्त केला आहे. क्रिकेटला जपान आणि पूर्व आशियातील इतर भागांमध्ये लोकप्रिय करण्याची ही एक चांगली संधी असल्याचं त्यांनी म्हटलं. भारत आणि जपान यांच्यातील मैत्री अनेक वर्षांपासूनची आहे. त्यामुळे क्रिकेटच्या माध्यमातून या ७५ वर्षांच्या मैत्रीपूर्ण संबंधांचा उत्सव साजरा करणं हा एक खास अनुभव ठरणार असल्याचं सैकिया यांनी सांगितलं.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। रविवार ।
दि. 06 सप्टेंबर 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



# दापोडीच्या सर्वांगीण विकासासाठी माई काटे यांचा पुढाकार!

## विविध विकासकामांबाबत सकारात्मक चर्चा; प्रलंबित कामांना गती देण्यासाठी नियोजन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**दापोडी परिसराचा सर्वांगीण आणि नियोजनबद्ध विकास व्हावा, नागरिकांना आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात तसेच अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या विकासकामांना गती मिळावी, यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या नगरसेविका स्वाती उर्फ माई काटे यांनी पुढाकार घेतला आहे. परिसरातील विविध महत्त्वाच्या विकासकामांसंदर्भात संबंधित पातळीवर सकारात्मक चर्चा करून कामांच्या पुढील नियोजनावर भर देण्यात आला.**




दापोडीतील महापुरुषांच्या स्मारकांचा विकास, नवीन पाण्याची टाकी, नदीपात्राच्या संरक्षणासाठी संरक्षक भिंत, स्मशानभूमी व दफनभूमीचा विकास, हुतात्मा भगतसिंग शाळेचा विकास यांसारख्या महत्त्वाच्या कामांचा यामध्ये समावेश आहे.

नागरिकांच्या आरोग्य आणि शारीरिक तंदुरुस्तीच्या दृष्टीने दवाखाना, जिम आणि विरंगुळा केंद्र, तर सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांना हक्काचे व्यासपीठ मिळावे यासाठी सांस्कृतिक भवन आणि प्रशासकीय इमारतीच्या उभारणीबाबतही चर्चा करण्यात आली. लहान मुले, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी गार्डन, स्विमिंग पूल आणि प्लेग्राउंड यांसारख्या सुविधा विकसित करण्यावरही भर देण्यात आला आहे.

पावसाळ्यात नागरिकांना होणाऱ्या त्रासावर कायमस्वरूपी उपाय करण्याच्या दृष्टीने ड्रेनेज आणि स्टॉर्म वॉटर लाईनची कामे, तसेच अंतर्गत व प्रमुख रस्त्यांच्या दर्जेदार विकासासाठी कॉंक्रीट रस्त्यांच्या कामांना प्राधान्य देण्याबाबत नियोजन करण्यात आले. विशेषतः गणेश नगर ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, बोपोडी पूल, एसटी रोड ते फुगेवाडी या महत्त्वाच्या मार्गावर सिमेंट कॉंक्रीट रस्ता विकसित करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. हा मार्ग विकसित झाल्यास परिसरातील वाहतूक अधिक सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

सिद्धार्थ नगर, प्रभाग क्रमांक ३० येथील जुने व अर्धवट अवस्थेतील शौचालय असलेली जागा मोकळी करून त्या ठिकाणी नवीन भवन उभारण्याचेही नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे या जागेचा नागरिकांच्या उपयोगासाठी अधिक चांगल्या पद्धतीने वापर होणार आहे. दरम्यान, दापोडी येथे तलाठी कार्यालयासाठी जागा उपलब्ध झाल्याबद्दल दिवंगत उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार साहेब, महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष तथा पिंपरी विधानसभा आमदार मा. अण्णासाहेब बनसोडे, तसेच महापालिका आयुक्त आणि संबंधित अधिकारीवर्गाबद्दल स्वाती उर्फ माई काटे यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

“दापोडीचा विकास हा केवळ काही रस्ते किंवा इमारतींपुरता मर्यादित नसून नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित प्रत्येक सुविधा सक्षम करण्याचा आमचा प्रयत्न आहे. पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण, क्रीडा, सांस्कृतिक सुविधा आणि महापुरुषांच्या स्मारकांचा विकास या सर्व कामांचा सातत्याने पाठपुरावा करून दापोडीला अधिक सुंदर, सुरक्षित आणि सुविधासंपन्न बनविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत,” असे नगरसेविका स्वाती उर्फ माई काटे यांनी सांगितले.

> “दापोडीचा सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय आहे. नागरिकांच्या मूलभूत गरजांपासून ते शिक्षण, आरोग्य, क्रीडा, सांस्कृतिक सुविधा, महापुरुषांच्या स्मारकांचा विकास आणि दर्जेदार रस्त्यांपर्यंत प्रत्येक कामाला गती देण्यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा करत आहोत. केवळ आश्वासने नव्हे, तर नियोजनबद्ध विकासकामांच्या माध्यमातून दापोडीचा चेहरामोहरा बदलण्याचा आमचा संकल्प आहे. नागरिकांचा विश्वास आणि सहकार्य हीच आमच्या कामाची खरी ताकद आहे.”
>
> **- स्वाती उर्फ माई काटे, नगरसेविका, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी**

# सायबर सुरक्षा अभियानात एमआयटी एसीएससी, आळंदीची उल्लेखनीय प्रगती

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**डिजिटल युगात वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थी, युवक आणि समाजामध्ये सायबर सुरक्षेबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने क्विक हील फाउंडेशन यांच्या ‘सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा – अर्न अँड लर्न २०२६–२७’ या राष्ट्रीय अभियानांतर्गत एमआयटी एसीएससी, आळंदीच्या वतीने विविध सायबर सुरक्षा आणि फसवणूक प्रतिबंधक जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत.**



या अभियानाच्या माध्यमातून एमआयटी एसीएससीच्या सायबर वॉरियर टीमने विविध शाळा, महाविद्यालये, संस्था आणि समुदायांमध्ये प्रत्यक्ष भेट देऊन विद्यार्थी व नागरिकांशी संवाद साधला. सायबर धोके ओळखणे, वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवणे आणि ऑनलाइन व्यवहार करताना आवश्यक खबरदारी घेणे याबाबत प्रत्यक्ष उदाहरणे, संवादात्मक चर्चा आणि प्रकरण अभ्यासाच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आले.

अभियानादरम्यान ओटीपी फसवणूक, फिशिंग, बनावट लिंक, मजबूत संकेतशब्द, द्वि-घटक प्रमाणीकरण, समाजमाध्यमांची सुरक्षितता, डिजिटल पाऊलखुणा, ऑनलाइन गेमिंग, यूपीआय व क्यूआर कोड फसवणूक, मोबाईल ॲप सुरक्षितता, सायबर बुलिंग आणि ऑनलाइन गोपनीयता यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर जनजागृती करण्यात आली. सायबर फसवणूक झाल्यास राष्ट्रीय सायबर गुन्हे हेल्पलाईन १९३० वर संपर्क साधणे आणि अधिकृत संकेतस्थळावर तक्रार नोंदविण्याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

याशिवाय जनसमुदायापर्यंत पोहोचण्यामध्ये ७० टक्के, माध्यम प्रसिद्धीमध्ये ७३.३३ टक्के, उपलब्धीमध्ये ७६.८० टक्के, अंतर्गत व बाह्य सामूहिक उपक्रमांमध्ये ५० टक्के आणि फसवणूक प्रतिबंधक सक्रियता उद्दिष्टामध्ये २९ टक्के प्रगती साधली आहे.

ही कामगिरी सायबर वॉरियर टीमच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे आणि विविध ठिकाणी राबविण्यात आलेल्या प्रत्यक्ष जनजागृती उपक्रमांचे फलित आहे. विद्यार्थ्यांपासून कामगार समुदायापर्यंत समाजातील विविध घटकांमध्ये सायबर सुरक्षिततेचा संदेश पोहोचविण्याचे कार्य या अभियानाच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

या अभियानाला क्विक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा मा. सौ. अनुपमा काटकर मॅडम आणि सहयोगी संचालक मा. श्री. अजय शिर्के सर यांचे मार्गदर्शन व प्रेरणा लाभत आहे.

तसेच एमआयटी एसीएससी, आळंदीचे फॅकल्टी कोऑर्डिनेटर मा. श्री. अमित तळे सर यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर वॉरियर टीमच्या विविध जनजागृती उपक्रमांचे नियोजन व अंमलबजावणी करण्यात येत आहे.

“माझा डेटा, माझी जबाबदारी” हा संदेश विद्यार्थी आणि समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचवत सजग नागरिक, सुरक्षित डिजिटल भविष्य आणि सुरक्षित भारत घडविण्याच्या दिशेने एमआयटी एसीएससी, आळंदीची सायबर वॉरियर टीम सातत्याने कार्यरत आहे.

### कामगिरीत उल्लेखनीय प्रगती

सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा – अर्न अँड लर्न २०२६–२७ च्या महाविद्यालयीन कामगिरी अहवालानुसार, एमआयटी एसीएससी, आळंदीने सादरीकरणातील कामगिरीमध्ये १०० टक्के, परिणामकारकतेमध्ये ९३.१३ टक्के आणि अनुपालनामध्ये ९२.३ टक्के कामगिरी नोंदवली आहे.

# नूतन अभियांत्रिकीमध्ये ‘स्मार्ट इंडिया हॅकाथॉन’

## १२०० विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग; उद्योग–शैक्षणिक संस्थांमधील सहकार्याला बळ

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**नूतन महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी येथे स्मार्ट इंडिया हॅकाथॉन (एसआयएच) २०२६ चे संस्थास्तरीय आयोजन नुकतेच करण्यात आले. या उपक्रमात २०० हून अधिक संघांमधील १२०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध नाविन्यपूर्ण कल्पना आणि तंत्रज्ञानाधारित उपाय सादर केले.**




या उद्घाटन समारंभास प्रमुख पाहुणे म्हणुन शास्त्रज्ञ तथा सी_डीएसी चे संयुक्त संचालक, महेश भार्गव, लॉरेल्स टेक्नॉलॉजी चे संचालक विराग सरनाईक, उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना सर्जनशील विचार करण्याची, समकालीन समस्यांवर व्यावहारिक उपाय विकसित करण्याची तसेच उद्योजकीय दृष्टिकोन अंगीकारण्याची प्रेरणा मिळाली.

कार्यक्रमाच्या स्वागतपर भाषणात एनएमआयईटी संचालक डॉ.प्रमोद पाटील यांनी नवोपक्रम, संघभावना आणि सहकार्याच्या माध्यमातून समस्या सोडविण्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी एसआयएच २०२६ चे तीन प्रमुख स्तंभ — “इनोवट , अँड क्रिएट इम्पॅक्ट ” अर्थात “नवोपक्रम करा, सहकार्य करा आणि प्रभाव निर्माण करा” असे स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी पारंपरिक विचारांच्या पलीकडे जाऊन समाज आणि उद्योगांसमोरील वास्तविक समस्यांवर परिणामकारक उपाय विकसित करण्याचे आवाहन त्यांनी केले.

डॉ. अश्विनी शिंदे, एसपीओसी , एस आय एच २०२६ यांनी स्मार्ट इंडिया हॅकाथॉनची उद्दिष्टे, सहभाग प्रक्रिया, मूल्यमापन पद्धती आणि या उपक्रमाचे महत्त्व याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

संस्थास्तरीय हॅकाथॉनचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे १५ उद्योगतज्ज्ञांचा ज्युरी सदस्य म्हणून सहभाग. हे उद्योगतज्ज्ञ सहभागी संघांनी सादर केलेल्या नाविन्यपूर्ण कल्पना आणि उपायांचे मूल्यमापन करीत आहेत. त्यांच्या सहभागामुळे विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन, व्यावसायिक अभिप्राय आणि वास्तविक औद्योगिक समस्यांची जाणीव होत असून, उद्योग–शैक्षणिक संस्था संबंध अधिक दृढ होण्यास मदत होत आहे

संस्थेचे अध्यक्ष माजी राज्यमंत्री संजय बाळा भेगडे, उपाध्यक्ष नंदकुमार शेलार अभियांत्रिकीच्या कार्यकारी समितीचे चेअरमन राजेश म्हस्के, सचिव संतोष खांडगे आणि कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी या उपक्रमाचे कौतुक विद्यार्थ्यांनी नवोपक्रम, उद्योजकता आणि तंत्रज्ञानाधारित उपायांच्या माध्यमातून समाज व उद्योगांच्या विकासात योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. डॉ. मदगोंडा बिरादार यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले.




# भोसरी येथील शिक्षणतज्ज्ञ शिवलिंग दवळेश्वर सरांना ‘समाजभूषण’ पुरस्कार

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**कर्नाटकातून महाराष्ट्रात येऊन शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय ठसा उमटवणारे भोसरीतील संत साई हायस्कूलचे संस्थापक व मुख्याध्यापक शिवलिंग नीलकंठ दवळेश्वर यांना गुरुवारी ‘समाजभूषण विशेष सन्माना’ने गौरविण्यात आले. लिंगायत संघर्ष समिती आणि वीरशैव इंटरनॅशनल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने बिबवेवाडी येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृहात हा भव्य सत्कार सोहळा पार पडला.**



ज्येष्ठ नेते व माजी केंद्रीय मंत्री खा. शरद पवार यांच्या शुभहस्ते शिवलिंग दवळेश्वर सरांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी ‘लिंगायत समाज गौरव व स्मृती गौरव स्मरणिके’चे विमोचनही मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. कर्नाटकातून येऊन महाराष्ट्रात शिक्षण क्षेत्रात उभे केलेले संस्थात्मक कार्य आणि भावी पिढ्यांच्या जडणघडणीतील योगदान अत्यंत प्रेरणादायी असल्याचे गौरवोद्गार यावेळी वक्त्यांनी काढले.

दवळेश्वर सरांना मिळालेल्या या सन्मानाबद्दल संत साई स्कूल परिवार आणि आदिनाथ नगर (भोसरी) परिसरातून त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

### मान्यवरांची प्रमुख उपस्थिती

या दिमाखदार सोहळ्यास पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे सह-अध्यक्ष ह.भ.प. सदगुरु गहिनीनाथ ज्ञानेश्वर महाराज औसेकर आणि सिक्कीमचे माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय लिंगायत व वीरशैव समाजातील नागरिक, शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# भक्ती आणि संस्कृतीचा अनोखा संगम

## गायत्री स्कूलमध्ये कृष्णजन्माष्टमी व दहीहंडी सोहळा उत्साहात संपन्न

महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड

**स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ संचलित ‘गायत्री इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, मोशी’ येथे कृष्णजन्माष्टमी व दहीहंडी सोहळा अत्यंत भक्तिमय आणि उत्साही वातावरणात दिमाखात पार पडला. या वेळी विद्यार्थ्यांनी पारंपरिक पोशाखात विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करत संपूर्ण परिसर कृष्णमय करून टाकला होता.**

### मानवतेचे गोकुळ उभे करूया!

भगवान श्रीकृष्णांनी जगाला केवळ धर्माची शिकवण दिली नाही, तर सत्य, कर्तव्य, प्रेम, मैत्री आणि योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याचा संदेश दिला. आजच्या बदलत्या काळात त्यांच्या विचारांचा आदर्श घेत निसर्गरक्षण, समाजात बंधुभाव, गरजूंची मदत आणि व्यसनमुक्त व हिंसामुक्त समाजाची निर्मिती करण्याची गरज आहे. स्वतःच्या आनंदासोबत इतरांच्या आयुष्यात आनंद निर्माण करून मानवतेचे ‘गोकुळ’ उभे करणे हीच खरी जन्माष्टमी, असा संदेश संस्थाध्यक्ष विनायक भोंगाळे यांनी दिला.



या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष श्री. विनायक भोंगाळे, व्यवस्थापकीय संचालिका सौ. कविता भोंगाळे-कडू पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती अंजली भागवत आणि विपणन अधिकारी श्री. शैलेंद्र सिंग यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

विद्यार्थी, शिक्षक व पालकांना मार्गदर्शन करताना संस्थाध्यक्ष श्री. विनायक भोंगाळे म्हणाले, “भगवान श्रीकृष्णांनी जगाला केवळ धर्माची शिकवण दिली नाही; तर सत्य, कर्तव्य, प्रेम, मैत्री आणि योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याचा मोलाचा संदेश दिला आहे. आजच्या काळात त्यांच्या जीवनकार्यातून प्रेरणा घेऊन आपण निसर्गरक्षण, समाजात बंधुभाव, गरजूंची मदत आणि व्यसन-हिंसामुक्त समाजाची निर्मिती केली पाहिजे. स्वतःच्या आनंदासोबतच इतरांच्या आयुष्यात आनंद निर्माण करून मानवतेचे ‘गोकुळ’ उभे करणे हीच खरी जन्माष्टमी ठरेल.”

शाळेत शिक्षण, क्रीडा व वाचन संस्कृतीसोबतच भारतीय परंपरा आणि सांस्कृतिक वारसा जपण्याचे उत्तम कार्य केले जाते, अशा शब्दांत उपस्थित पालकांनी आपल्या समाधानकारक प्रतिक्रिया व्यक्त केल्या. उपस्थितांच्या दाद आणि उत्साहात दहीहंडी फोडून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## प्रतिभा इंटरनॅशनल स्कूल अँण्ड ज्युनिअर कॉलेज मध्ये श्रीकृष्ण जन्मोत्सव उत्साहात



महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

**चिंचवड येथील प्रतिभा इंटरनॅशनल स्कूल अँण्ड ज्युनिअर कॉलेज ( सी.बी. एस.ई. ) येथे शालेय विद्यार्थ्यांनी भगवान श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात साजरा केला. नर्सरी ते इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा यात समावेश होता . यावेळी चिमुकल्यांनी राधा-कृष्णाच्या वेशभूषेत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.**



### राधा-कृष्णाच्या वेशभूषेत चिमुकल्यांनी वेधले लक्ष!

प्रतिभा इंटरनॅशनल स्कूलमध्ये कृष्णजन्माष्टमीचा उत्सव भक्ती, संस्कृती आणि आनंदाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. नर्सरी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. राधा-कृष्णाच्या वेशभूषेतील चिमुकल्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले, तर भजन, गोपाळकाला, नृत्यनाटिका आणि दहीहंडी यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. श्रीकृष्णाच्या बाललीलांमधून विद्यार्थ्यांना सत्य, प्रेम, बंधुभाव आणि धर्माचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. अशा सांस्कृतिक उपक्रमांमधून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती व परंपरांची ओळख होऊन संस्कारांची समृद्ध शिदोरी मिळते, असा संदेश या सोहळ्यातून देण्यात आला.

शाळेच्या प्रांगणाला फुले, मोरपिस आणि मटकीने सजवण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात भगवान श्रीकृष्णाच्या मूर्तीचे पूजन आणि आरतीने झाली. यानंतर विद्यार्थ्यांनी भजन, गोपाळकाला, आणि श्रीकृष्णाच्या जीवनावरील नृत्यनाटिका सादर केल्या.

विद्यार्थ्यांसाठी खास दहीहंडीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. चिमुकल्या गोविंदांनी एकमेकांच्या खांद्यावर उभे राहून हंडी फोडण्याचा प्रयत्न केला, यावेळी संपूर्ण परिसर ‘गोविंदा आला रे आला’ च्या जयघोषाने दुमदुमून गेला. शिक्षकांनी श्रीकृष्णाच्या बाललीलांवर आधारित बोधकथा सांगून मुलांना सत्य, प्रेम आणि धर्माचे महत्व पटवून दिले.

यावेळी कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा, खजिनदार डॉ . भूपाली शहा , संचालिका डॉ. तेजल शहा, शाळा व ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या डॉ. वृंदा जोशी , उपमुख्याध्यापिका लिजा सोझ्रु यांच्यासह सर्व विद्यार्थी ,शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे नियोजन व संयोजन प्राचार्या डॉ. वृंदा जोशी, उपप्राचार्या लिजा सोझ्रु समवेत शिक्षकांनी केले तर आभार प्रदर्शन शाळेच्या सांस्कृतिक विभाग प्रमुखांनी केले. शेवटी सर्व विद्यार्थ्यांना प्रसाद वाटप करण्यात आले.